## एक दिवशीय विशेष श्रम संस्कार शिबीर

**हुबालवाडी येथे वृक्षदिंडी व वृक्षारोपण अभियान संपन्न**

गुरुवार, दिनांक 07 ऑगस्ट, 2025 रोजी कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत' दत्तक खेडे हुबालवाडी, तालुका वाळवा येथे वृक्षदिंडी व वृक्षारोपण अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर अभियानाची सुरुवात पंचायत समिती वाळवाचे कृषी विस्तार अधिकारी मा. श्रीधर कुलकर्णी यांच्या हस्ते व हुबालवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ.मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच मा. अंकुश विश्वास घाडगे, ग्रामपंचायत अधिकारी मा.अमर वाटेगावकर व ग्रामपंचायतचे सर्व आजी माजी सरपंच व सदस्य आणि प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीमध्ये वृक्षदिंडीने करण्यात आली.

या वृक्षदिंडी मध्ये पालखी मध्ये संत गाडगेबाबा यांची प्रतिमा व पृथ्वीची गोल प्रतिकृती व वृक्ष ठेवण्यात आले होते. या वृक्ष दिंडी मध्ये पर्यावरण पूरक जनजागृतीपर घोषणा देत, पर्यावरण पूरक संदेश देणारे फलक विद्यार्थी व नागरिकांच्या हातात देण्यात आले होते. ही वृक्षदिंडी जिल्हा परिषद शाळा-संपूर्ण गाव-ग्रामपंचायत कार्यालय-जिल्हा परिषद शाळा अशी आयोजित करण्यात आली होती. या वृक्षदिंडीमध्ये हुबालवाडीच्या जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक, विद्यार्थी तसेच कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज, इस्लामपूर मधील सीनियर व ज्युनिअर विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश आठवले, प्रा.डॉ. संतोष खडसे. प्रा.वंदना पाटील, प्रा. अश्विनी थोरात व स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तसेच वाळवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा. डॉ. आबासाहेब पवार यांच्या हस्ते व हुबालवाडी गावच्या लोकनियुक्त सरपंच सौ.मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच मा.अंकुश विश्वास घाडगे, ग्रामपंचायत अधिकारी मा.अमर वाटेगावकर व ग्रामपंचायतचे सर्व आजी-माजी सरपंच व ग्रामपंचायत सदस्य आणि प्रतिष्ठित नागरिक यांच्या उपस्थितीमध्ये करण्यात आली.

हुबालवाडी येथील जिल्हा परिषद शाळा परिसरामध्ये सुमारे (150) दीडशे वृक्षांची लागवड करण्यात आली. यामध्ये बांबू लागवड, फुल व फळ वृक्षाची लागवड करण्यात आली. यानंतर सर्व गावकरी व विद्यार्थ्यांना 'माझी वसुंधरा' या योजनेविषयी गटविकास अधिकारी मा. डॉ. आबासाहेब पवार यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे स्वागत- प्रास्ताविक हुबालवाडी गावचे प्रतिष्ठित नागरिक सचिन फुलारे यांनी केले. त्यांनी या कार्यक्रमाचा उद्देश थोडक्यात मांडला. मा.श्री.श्रीधर कुलकर्णी यांनी भविष्याचा वेध घेत सेंद्रिय शेतीची गरज, लोकसहभागातून गाव परिवर्तन, वृक्ष लागवडव वृक्ष संवर्धन काळाची गरज

असल्याचे सांगितले. आपल्या सर्वांना शाश्वत विकासाचे धोरण 2030 पर्यंत साध्य करावयाचे आहे त्यासाठी पर्यावरण अभियान राबवणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन करत त्यांनी संपूर्ण गाव सोलर युक्त करण्याचे आव्हान ही ग्रामस्थांना केले. प्लास्टिक बंदी घालणे काळाची गरजेचे आहे असे मत व्यक्त करत आपल्या मनोगतामध्ये उपस्थित सर्व ग्रामस्थ व विद्यार्थ्यांना पर्यावरण पूरक प्रतिज्ञा दिली.

मा.डॉ.आप्पासाहेब पवार यांनी 'माझी वसुंधरा' अभियानांतर्गत आयोजित वृक्ष लागवड अभियाना बद्दल ग्रामपंचायतीचे सरपंच, उपसरपंच व ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थांचे अभिनंदन केले. यावेळी ते म्हणाले पर्यावरण संतुलनासाठी वृक्ष लागवड ही वैयक्तिक व सार्वत्रिक स्तरावर होणे गरजेचे आहे. पर्यावरणाचा होणारा ऱ्हास, वाढते तापमान आपल्यासाठी धोकादायक आहे. बदलत्या ऋतुमानास मानवच जबाबदार असल्याची खंतही त्यांनी व्यक्त केली. मागील 35 वर्षांमध्ये 210 नैसर्गिक आपती आल्या असून दरवर्षी सुमारे 560 आपत्ती येण्याचे भविष्य त्यांनी वर्तवले. त्यामुळे प्रचंड प्रमाणात वित्तहानी होईल. त्यासाठी आपण घनकचरा, सांडपाणी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. आपणास 92 टक्के ऑक्सिजन हा समुद्राच्या पाण्यापासून मिळतो. कारण समुद्राच्या पाण्यात वाढणाऱ्या प्लास्टिकमुळे मानवी जीवनाला धोका वाढत आहे. आज तोच समुद्र प्लस्टिकचे आगार बनला असल्याने आपल्याला ऑक्सिजनची कमतरता भासत आहे व पिण्यायोग्य पाणी आपल्याला मिळत नसल्याचे त्यांनी सांगितले. आपण वापरत असलेल्या कीटक नाशकामुळे मधमाशा मृत होत आहेत. निसर्गातील मधमाशा नष्ट झाल्या तर मानव जमिनीवर फक्त चारच वर्षे जगू शकेल असेही ते म्हणाले. आपण आपल्या जीवन पद्धती मध्ये बदल करणे काळाची गरज असून पर्यावरणामुळे समृद्धी आली पण फॅशनमुळे ती समृद्धी जाण्याच्या मार्गावर असल्याची खंत ही त्यांनी व्यक्त केली. पाण्याच्या कमतरतेमुळे प्राणी, पक्षी व जीवजंतू यांच्या प्रजाती नष्ट होत चाललेल्या आपल्याला दिसून येतात. अत्यंत गरजेच्या ठिकाणीच फक्त प्लास्टिकचा वापर करावे असे आवाहन ही केले. मुंबईत कचऱ्यापासून 200 कोटी रुपये कमावले जातात. पृथ्वीवरील 2.5 टक्के पाणी फक्त पिण्याचे आहे त्यातील 1.5 टक्के पाणी नष्ट होत असून त्याचे संरक्षण व संवर्धन करणे आज काळाची गरज आहे. आपण आपली जीवनशैली बदलणे गरजेचे असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले. तर शाश्वत विकास होणे आज काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

नंतर हुबालवाडी ग्रामस्थांच्या वतीने आयोजित निबंध लेखन स्पर्धा, चित्रकला स्पर्धा व रांगोळी स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचे प्रमुख पाहुणे गट विकास अधिकारी मा.डॉ. आबासाहेब पवार, सहाय्यक गटविकास अधिकारी श्री.सुभाष लक्ष्मण सावंत व कृषी विस्तार अधिकारी मा.श्रीधर कुलकर्णी यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. यावेळी हुबालवाडी गावचे प्रतिष्ठित नागरिक उद्योगपती श्री.बाबुराव हुबाले, श्री.संजय तात्या हुबाले, सचिन फुलारे तसेच गावातील बचत

गटातील सर्व अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व सदस्य, ग्रामस्थ, जिल्हा परिषद शाळा हुबालवाडीच्या मुख्याध्यापिका जाधव व सर्व स्टाफ उपस्थित होते. श्री.जयकर पवार यांनी कार्यक्रमाचे आभार मानले. या कार्यक्रमाचे संयोजन कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. प्रकाश आठवले, प्रा. संतोष खडसे, प्रा.अश्विनी थोरात, प्रा. वंदना पाटील व प्रा. हरीश वसावे यांनी केले.



**पंचायत समिती वाळवाचे कृषी विस्तार अधिकारी मा. श्रीधर कुलकर्णी यांच्या हस्ते व सरपंच सौ.मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच मा. अंकुश विश्वास घाडगे व यांच्या उपस्थितीमध्ये वृक्षदिंडीचे उद्घाटन करण्यात आले.**




वृक्ष दिंडीत सहभागी स्वयंसेवक



वाळवा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी मा. डॉ. आबासाहेब पवार यांच्या हस्ते व सरपंच सौ.मंगल बाबुराव हुबाले, उपसरपंच मा.अंकुश विश्वास घाडगे व सदस्य यांच्या उपस्थितीमध्ये वृक्षारोपण करण्यात आले .




**सरपंच सौ.मंगल बाबुराव हुबाले वृक्षारोपण करताना**



**हुबालवाडी येथील जिल्हा परिषद शाळा परिसरामध्ये वृक्षरोपण करताना स्वयंसेवक**




**वृक्षारोपण करताना मान्यवरांना समवेत स्वयंसेवक**




**वृक्षारोपण करताना प्रा. डॉ. संदीप पाटील व स्वयंसेवक**




**वृक्षारोपण समारोह प्रसंगी स्वयंसेवकांना मार्गदर्शन करताना गटविकास अधिकारी मा. डॉ. आबासाहेब पवार**




**वृक्षारोपण समारंभाच्या समारोप प्रसंगी उपस्थित स्वयंसेवक**